# उपविधान समिती

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# तिसरा अहवाल

## (२०१३)

सत्यमेव जयते

(दिनांक १८ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभा/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१३

उपविधान समिती

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# तिसरा अहवाल

(२०१३)

एचबी २०५—१

## उपविधान समिती
## (सन २०१२-२०१३)

*(१) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.
(३) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(४) श्री. बलदेव खोसा, वि.स.स.
(५) श्री. आप्पासाहेब सा. रे. पाटील, वि.स.स.
*(६) रिक्त
(७) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
**(८) श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
**(९) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.
(१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.
***(११) श्री. अशोक शिंदे, वि.स.स.
******(१२) श्री. राम कदम, वि.स.स.
(१३) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.
(१४) श्री. अनिल गोटे, वि.स.स.
****(१५) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(१६) श्री. विजय सावंत, वि.प.स.
****(१७) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.
(१८) श्री. संजय पाटील, वि.प.स.
*****(१९) ॲड. अनिल परब, वि.प.स.
***(२०) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. म. मु. काज, उप सचिव
(३) श्री. जि. म. भोळे, उप सचिव

---

* श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तथा समिती प्रमुख यांनी उपविधान समितीच्या सदस्यत्वाचा व समिती प्रमुख पदाचा राजीनामा दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी दिला. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांचा राजीनामा त्याच दिवशी [redacted] मंजूर केला. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या समिती प्रमुख पदावर श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २०१३ पासून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी नामनियुक्ती केली.

श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २९ जानेवारी, २०१३ पासून उपविधान समितीच्या "समिती प्रमुख" पदावर नामन्नियुक्ती केल्यामुळे सदरहू पद रिक्त आहे.

** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. सुधाकर देशमुख वि.स.स. यांच्या ऐवजी श्री. प्रमोद जठार, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांच्या ऐवजी श्री. सुरेश खाडे, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

*** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य प्रा. शरद पाटील, वि.स.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या त्यांच्या जागेवर श्री. अशोक शिंदे, वि.स.स. यांची दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ पासून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या त्यांच्या जागेवर ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ पासून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्ठात आल्याने रिक्त झालेल्या जागेवर त्यांची नव्याने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी उपविधान समितीवर नामनियुक्ती करण्यात आली आहे.

***** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांच्या ऐवजी ॲड. अनिल परब, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. रामदास कदम, वि.प.स यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांची दिनांक ६ ऑगस्ट, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**** सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या उपविधान समितीवरील समिती सदस्य श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी "निमंत्रित सदस्य" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

****** श्री. राम कदम, वि.स.स. यांना दिनांक २० मार्च, २०१३ रोजी दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित करण्यात आले आहे.

# उपविधान समिति

## २०१०-२०११

## सदस्यांची सूची

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (१) | श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख | |
| (२) | श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. | |
| (३) | श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स. | |
| (४) | श्री. काशीराम पावरा, वि.स.स. | |
| (५) | श्री. वामनराव कासावार, वि.स.स. | |
| (६) | श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. | |
| (७) | श्री. संजय वाघचौरे, वि.स.स. | |
| (८) | श्री. मानसिंग नाईक, वि.स.स. | |
| (९) | श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. | |
| (१०) | श्री. अशोक शिंदे, वि.स.स. | |
| (११) | प्रा. शरद पाटील, वि.स.स. | |
| (१२) | ॲड. उत्तमराव ढिकले, वि.स.स. | |
| (१३) | श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स. | |
| (१४) | श्री. शरद गावित, वि.स.स. | |
| (१५) | श्री. उल्हास पवार, वि.प.स. | |
| (१६) | रिक्त | |
| (१७) | श्री. संजय पाटील, वि.प.स. | |
| (१८) | श्री. अरुणकाका जगताप, वि.प.स. | |
| (१९) | श्री. दिवाकर रावते, वि.प.स. | |

# प्रस्तावना

मी, उपविधान समितीचा समिती प्रमुख, समितीने तिच्या वतीने मला अहवाल सादर करण्यास अधिकार दिल्यानुसार समितीचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षातील कामकाजासंबंधीत तिसरा अहवाल सादर करीत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तथा समिती प्रमुख यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी समितीच्या सदस्यत्वाचा व समिती प्रमुख पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदरहू पद दिनांक २९ जानेवारी, २०१३ पर्यंत रिक्त होते. या कालावधीत समितीच्या बैठका होऊ शकल्या नाहीत.

या अहवालात समितीने १५ प्रारुप अधिसूचना व ३२ अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या.

समितीने उद्योग विभागाची (अंतिम अधिसूचना क्रमांक ७२) तसेच वित्त विभागाची (अंतिम अधिसूचना क्रमांक ५) या अधिसूचना विचारात घेऊन दिनांक १२ ऑक्टोबर २०११ रोजी संबंधित विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली होती. त्याखेरीज समितीने सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या कालावधीत दिनांक १७, २३, ३० मे, २०१२ ; २, २३, ३० ऑगस्ट, २०१२ ; १३ सप्टेंबर, २०१२ ; १२, २०, २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी अशा एकूण १० बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये समितीने १५ प्रारुप अधिसूचनांचे व ३२ अंतिम नियम प्रसिद्ध करणाऱ्या अधिसूचनांचे परिक्षण केले. समितीने दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचारविनिमय केला आणि तो संमत केला.

विधान भवन
मुंबई,
दिनांक : १६ एप्रिल, २०१३

गणपतराव देशमुख
समिती प्रमुख,
उपविधान समिती

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (एक) | उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग | |
| | अंतिम अधिसूचना क्रमांक ७२—महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारीत) नियमावली, २००९ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक आयडीसी २००८/प्र.क्र.५५१/ड-१४, दिनांकित ८ जून, २००९. | १ |
| (दोन) | अंतिम अधिसूचना क्रमांक ५—महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) नियम, २०११ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक तेविआ.१०१०/प्र.क्र.७४/२०१०/ वित्त आयोग कक्ष, दिनांकित ११ मार्च, २०११. | २७ |
| (तीन) | उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारुप नियम | ४० |
| (चार) | उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम | ४४ |
| (पाच) | कार्यावलीचे परिशिष्ट | ५० |
| (सहा) | बैठकीचे कार्यवृत्त | ५५ |

## उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग

**अंतिम अधिसूचना क्रमांक ७२—महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारीत) नियमावली ,२००९ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक आयडीसी २००८/प्र.क्र.५५१/उ-१४, दिनांकित ८ जून, २००९.**

**उद्देश :**

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम ६३ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली १९६२ तयार करण्यात आली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम १ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकामध्ये विहित तरतुदीच्या अनुषंगाने या नियमावलीमध्ये पुढीलप्रमाणे नियम क्रमांक ३० मध्ये पोट-कलम (१) व (२) समाविष्ट करण्यात आले आहेत.

| नियम क्रमांक ३० | क्षेत्र | कालावधी |
|---|---|---|
| (१) | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९७४ (सन १९७५ चा महा. १८) दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून लागू होण्यापूर्वी ज्या क्षेत्रांना प्रकरण ६ च्या तरतुदी लागू केल्या आहेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम, १ च्या पोट-कलम (३) अन्वये कलम ६ लागू केले असेल अशा सर्व क्षेत्रात कलम लागू केल्यापासून २० वर्षापर्यंत. |
| (२) | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९७४ (सन १९७५ चा महा. १८) दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून लागू झाल्यानंतर ज्या क्षेत्राला प्रकरण ६ च्या तरतुदी लागू केल्या आहेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम, १ च्या पोट-कलम (३) अन्वये कलम ६ लागू केले असेल अशा सर्व क्षेत्रात कलम लागू केल्यापासून १० वर्षापर्यंत. |

(२) अधिनियमातील तरतुदीनुसार औद्योगिक प्रयोजनासाठी क्षेत्र अधिसूचित केल्यानंतर काही प्रकरणी भूसंपादनास संबंधितांकडून होणारा विरोध व इतर कारणास्तव भूसंपादनाची कार्यवाही दीर्घकाळ प्रलंबित राहते. मात्र,नियमावलीमध्ये विहित केलेली कालमर्यादा उलटून गेल्यानंतर महामंडळास आवश्यक नसलेले क्षेत्रही विनाअधिसूचित करणे शक्य होत नाही. यास्तव बदलत्या परिस्थितीनुसार क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची उपरोक्त कालमर्यादा सुधारित करणे आवश्यक होते. यासाठी अधिनियमातील कलम ६३ च्या पोट-कलम (१) खालील तरतुदीमध्ये विहित केल्यानुसार महामंडळाशी आवश्यक विचारविनिमय केल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ मधील नियम ३० च्या पोट-नियम (१) व (२) मध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ मध्ये नियम ३० च्या पोट-नियम (१) व (२) मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याच्या प्रस्तावास शासनाची मान्यता दिनांक ३ जून,२००९ रोजी प्राप्त झाली आहे.

| नियम क्रमांक ३० | क्षेत्र | कालावधी |
|---|---|---|
| (१) | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९७४ (सन १९७५ चा महा. १८) दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून लागू होण्यापूर्वी ज्या क्षेत्रांना प्रकरण ६ च्या तरतुदी लागू केल्या आहेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम, १ च्या पोट-कलम (३) अन्वये कलम ६ लागू केले असेल अशा सर्व क्षेत्रात कलम लागू केल्यापासून ४० वर्षापर्यंत. |
| (२) | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९७४ (सन १९७५ चा महा. १८) दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून लागू झाल्यानंतर ज्या क्षेत्राला प्रकरण ६ च्या तरतुदी लागू केल्या आहेत. | महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम, १ च्या पोट-कलम (३) अन्वये कलम ६ लागू केले असेल अशा सर्व क्षेत्रात कलम लागू केल्यापासून ३५ वर्षापर्यंत. |

(४) सदरहू, सुधारित नियमांचा मसुदा विधी व न्याय विभागाकडून तपासून घेतल्यानंतर यासंदर्भातील आवश्यक अधिसूचना दिनांक ९ जून,२००९ च्या शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम ६३ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार उपरोक्त सुधारित नियम राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करणे आवश्यक असून राज्य विधान मंडळाने केलेल्या फेरफारास अधीन आहेत.

उपरोक्त अधिसूचना समितीने दिनांक १३ ऑक्टोबर,२०१० रोजी विचारार्थ घेतली असता समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

(१) शासनाने एमआयडीसीसाठी मागील ५ वर्षात किती जमिनी अधिग्रहीत केल्या ? त्यापैकी किती जमिनींवर उद्योग उभारण्यात आले ? तसेच, खाजगी उद्योगांसाठी किती जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या ? असल्यास, त्या सर्व जमिनींवर उद्योग उभे राहिले आहेत काय ? याबाबत जिल्हानिहाय माहिती देण्यात यावी ?

(२) एमआयडीसी व खाजगी संस्थांनी, जमिनी अधिग्रहीत करुनही अशा किती जमिनींवर अद्याप उद्योग उभारण्यात आले नाहीत, त्यामागील कारणे काय आहेत व किती जमिनी मूळ शेतकऱ्यांना परत केल्या ? याची मागील ५ वर्षाची जिल्हानिहाय माहिती देण्यात यावी ?

उपरोक्त मुद्दयांसंदर्भात विभागाकडून दिनांक २४ मार्च, २०११ रोजी प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट-"अ"** मध्ये सादर करण्यात आलेली आहे.

उपरोक्त माहिती समितीने दिनांक २८ सप्टेंबर,२०११ रोजीच्या बैठकीत विचारात घेतली असता त्यानुषंगाने समितीने उद्योग विभागाच्या प्रधान सचिव यांची साक्ष घेण्याचे ठरविले. सदरहू साक्ष दिनांक १२ ऑक्टोबर,२०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. साक्षी दरम्यान उपरोक्त अधिसूचने संदर्भात खालीलप्रमाणे चर्चा झाली :—

प्रथम विभागीय सचिवांनी उक्त अधिसूचनेसंदर्भातील पार्श्वभूमी समितीस विदित केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम हा अधिनियम सन १९६१ साली संमत करण्यात आला.

सुरुवातीला महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम १ च्या पोट-कलम (३) मध्ये ही तरतूद नव्हती. सन १९७५ मध्ये शासनाच्या असे निदर्शनास आले की, कोणतीही जमीन अधिसूचित केल्यानंतर जर कोणत्याही कारणामुळे ती जमीन नको असेल तर ती विनाअधिसूचित करण्याची तरतूद नव्हती. म्हणून शासनाने सन १९७५ च्या महा. १८ च्या परंतुकामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ही सुधारणा करण्यात आली. ही सुधारणा या अधिनियमामध्ये आहे. त्या आधारावर सन १९७५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९७४ च्या कलम ३० च्या पोट-कलम (१) आणि ३० च्या पोट-कलम (२) मध्ये नवीन तरतूद करण्यात आलेली आहे. दिनांक ४ फेब्रुवारी, १९७७ रोजी त्याची अधिसूचना काढण्यात आलेली आहे आणि ती दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून अंमलात आलेली आहे. त्याची नियम ३० च्या पोट-नियम (१) आणि ३० (२) मध्ये याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ पासून हे अंमलात आलेले आहे. जमीन अधिग्रहित करण्यासाठी शासन अधिसूचना जाहीर करते. ती १९७६ पूर्वीची असेल तर प्रकरण ६ मध्ये अधिसूचना काढून जमीन अधिग्रहित झाली त्या दिवसापासून २० वर्षापर्यंत जर शासनाला ही जमीन नको असेल तर ती जमीन विनाअधिग्रहित करण्यासंबंधीची तरतूद नियम ३० च्या पोट-नियम (१) मध्ये आहे. त्याच प्रमाणे नियम ३० च्या पोट-नियम (२) मध्ये दिनांक १५ सप्टेंबर, १९७६ नंतर अधिग्रहित केलेली जमीन १० वर्षापर्यंत विनाअधिग्रहित करण्यासंबंधीची तरतूद आहे.

पूर्वी २० वर्षाची आणि १० वर्षांची मुदत होती. ती मुदत कमी पडत असल्यामुळे २० वर्षाची मुदत ४० वर्षे आणि १० वर्षाची मुदत ३५ वर्षे अशी सुधारणा करुन जून, २००९ मध्ये अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

त्यावर समितीने असे विचारले की, शासनाने अगोदर घेतलेली जमीन जर शासनाला नंतर नको असेल तर ते कोणत्या निकषाच्या आधारावर ठरविले जाते ? त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरुवातीला जी जमीन घ्यावयाची आहे, त्या जमिनीचा साईट सर्व्हे जमीन-महसूल विभागातील

तज्ञ तसेच, जिल्हाधिकारी या सर्वांकडून एकत्रितपणे केला जातो. हा सर्व्हे करताना प्रामुख्याने तेथे पाण्याची उपलब्धता आहे की नाही वगैरे ३-४ गोष्टींची तपासणी केली जाते. तसेच, एखादी जमीन इरिगेटेड लँड असेल, किंवा वन विभागाची जमीन असेल तर अशा जमिनींच्या बाबतीत एकत्र नोटिफिकेशन काढले जाते. त्यानंतर कलम ३२ (१) अन्वये जमीन धारकांच्या हरकती मागविणे, सुनावणी घेणे वगैरे प्रोसिजर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केली जाते.

जमीन धारकांकडून हरकती मागविल्यानंतर आलेल्या हरकतींचा व जमीन इरिगेटेड लँड आहे की नाही, तेथे वाहतुकीची काही अडचण आहे का, तेथे इन्फ्रास्ट्रक्चरच्या दृष्टीने काही त्रुटी आहेत का ? या व इतर बाबींचा तांत्रिक दृष्टिकोनातून विचार करुन त्या जमिनीचे परीक्षण केले जाते. मग त्यावर आधारित स्पेसिफिक रिपोर्ट तयार करुन तो शासनाकडे सादर केला जातो. शासनस्तरावर त्यावर चर्चा होते. त्यावर शासनाचा योग्य निर्णय प्राप्त झाल्यानंतर डिनोटिफिकेशन बाबतची अधिसूचना काढली जाते.

या सर्व पार्श्वभूमीवर समितीने विचारणा केली की, भूसंपादनाबाबत देश पातळीवर केंद्र शासनाचा सन १८९४ चा अधिनियम आहे. या अधिनियमाच्या कलम ४ मध्ये जी जमीन घ्यायची असेल तिच्या निर्णयासाठी २ वर्षांची मुदत आहे. परंतु, २ वर्षे जर त्या जमिनीचा वापर केला नसेल तर पाहिली नोटीस लॅप्स होते. कायद्यातील ही तरतूद सर्वज्ञात आहे, खरे तर या कायद्यामध्ये असणारी २ वर्षांची तरतूद पुरेशी आहे असे समितीला वाटते, असे असताना आता ही मुदत का वाढविली जात आहे ?

एकदा जमिनीबाबतचे नोटिफिकेशन काढल्यानंतर त्या जमिनीमध्ये शेतकऱ्याला/जमीन मालकाला काहीही सुधारणा करता येत नाहीत. सन १८९४ च्या केंद्र शासनाच्या अधिनियमामध्ये अशा प्रकारची तरतूद आहे. आता आपण जी सुधारणा प्रस्तावित करीत आहात, त्यामध्ये देखील अशी तरतूद आहे का ?

पहिली नोटीस काढल्यानंतर त्या वेळेस जमिनीची जी किंमत असेल तीच किंमत शेतकऱ्याला/ जमीन मालकाला दिली जाते. परंतु, त्या जमिनीबाबतचा निर्णय जर २० वर्षांनंतर घेणार असाल तर, मधल्या काळात त्या जमिनीची जी किंमत वाढते त्याबाबत आपल्या कायद्यामध्ये काय तरतूद आहे ? या संदर्भात विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, एमआयडीसी ॲक्ट व केंद्र सरकारच्या भूसंपादनविषयक कायद्यातील काही तरतुदींमध्ये फरक आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये कलम ६ लागू केल्यानंतर ३ ते ४ वर्षाच्या कालावधीत जमिनीबाबतचा सर्व व्यवहार पूर्ण झाला पाहिजे असे समितीचे मत आहे. शेतकरी/जमीन मालकाला जमिनीचे पैसे कधी व कशाच्या आधारावर दिले जातात ? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नियम ३२ च्या पोट-कलम (२) नुसार पहिले नोटिफिकेशन काढतेवेळी जमिनीची पहिली किंमत

ठरविली जाते. ज्यावेळी कलम ६ ची नोटीस निघते त्यावेळी जो फरक असतो, त्यासाठी नियम ३२ च्या पोट-नियम (१) खाली निगोसिएशन केले जाते. निगोसिएशन करताना त्यावेळेचा रेट आणि आजचा रेट यांचा विचार करुन मॅक्झिमम बाजार दराच्या आधारे शेतकरी/जमीन मालकाला जमिनीची किंमत देण्याचा प्रयत्न केला जातो.

यावर समितीने विचारले की, निगोसिएशन झाले नाही, तर कायद्यामध्ये काय तरतूद आहे ? तसेच शेतकरी/जमीन मालकाला जमिनीचे पैसे किती दिवसांत दिले जातात ? त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, अशा परिस्थितीमध्ये कलम ३३ च्या पोट-कलम (३) खाली कंपल्सरी ॲक्विझीशन केले जाते. अशा प्रकरणांमध्ये पहिल्या वर्षी ९ टक्के इतके व्याज दिले जाते.

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, औद्योगिक प्रयोजनासाठी अधिसूचित करण्यात आलेल्या जमिनींबाबत एकदा नोटिफिकेशन काढले की त्या जमिनीमध्ये त्या शेतकऱ्याला/जमीन मालकाला काहीही सुधारणा करता येत नाही. विभागाकडून प्राप्त झालेल्या मागील ५ वर्षांच्या माहितीचे अवलोकन केले असता ताबा प्राप्त क्षेत्रातून मूळ शेतकऱ्यांना परत केलेले क्षेत्र बहुतांशी प्रकरणी " निरंक " असल्याचे दिसून येते. त्यामुळे समितीचे असे मत आहे की, औद्योगिक प्रयोजनासाठी अधिसूचित करण्यात आलेले व महामंडळास आवश्यकता नसलेले क्षेत्र विनाअधिसूचित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ च्या नियम ३० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये असलेली अनुक्रमे २० वर्षे व १० वर्षांची कालमर्यादा ही मुळातच अधिक आहे. या कालमर्यादेमुळे मूळ शेतकरी/जमीन मालकास जमिनीवर कोणत्याही स्वरुपाची विकासाची कामे करता येत नाही. त्यामुळे जर ही मुदत आणखी अनुक्रमे ४० वर्षे व ३५ वर्षांपर्यंत वाढविल्यास जमीन विनाअधिसूचित करण्याच्या प्रक्रियेतील दप्तरदिरंगाई वाढून मूळ जमीन मालक/शेतकऱ्यास जमिनीबाबतच्या निर्णयाची प्रदीर्घकाळ प्रतिक्षा करावी लागेल त्यामुळे समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली.

" औद्योगिक प्रयोजनासाठी अधिसूचित करण्यात आलेले व महामंडळास आवश्यकता नसलेले क्षेत्र विनाअधिसूचित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ च्या नियम ३० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये पूर्वी असलेली अनुक्रमे २० वर्षे व १० वर्षांची कालमर्यादा ही मुळातच अधिक असून ती आणखी अनुक्रमे ४० वर्षे व ३५ वर्षांपर्यंत वाढविल्याने जमीन विनाअधिसूचित करण्याच्या प्रक्रियेतील दफ्तरदिरंगाई वाढून परिणामी मूळ जमीन मालक/शेतकऱ्याला प्रदीर्घकाळ जमिनीबाबतच्या निर्णयाची प्रतिक्षा करावी लागेल व तेवढा वेळ जमिनीवर कोणत्याही स्वरुपाची विकासात्मक कामे करता येणार नाहीत. सबब, अधिसूचित क्षेत्राबाबतचा निर्णय त्वरेने घेण्यासाठी सदर कालमर्यादा उलट आणखी कमी करण्यात यावी व ते शक्य नसल्यास किमान अधिसूचनेपूर्वी जेवढी कालमर्यादा होती तेवढीच ठेवण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी "

# परिशिष्ट "अ"

## विवरणपत्र -१

मागील ५ वर्षातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनाचा तपशील

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नांव | मागील ५ वर्षात म.औ.वि. अधिनियम, १९६१ अन्वये अधिसूचित क्षेत्र | अधिसूचित क्षेत्रापैकी महामंडळाच्या ताब्यात आलेले क्षेत्र | ताबा प्राप्त क्षेत्रातील वाटप झालेल्या भुखंडांची संख्या व क्षेत्र | भुखंडाचे वाटप होऊनही उद्योग उभारणी न झालेल्या भुखंडांची संख्या व क्षेत्र | विहीत मुदतीत भुखंड विकसीत करुन उद्योग उभारणी न होण्याची कारणे | ताबा प्राप्त औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटपासाठी उपलब्ध भुखंडांची संख्या व क्षेत्र | ताबा प्राप्त क्षेत्रातून मुळ शेतक-यांना परत केलेले क्षेत्र (कलम ३९ (२) अन्वये) | विहीत मुदतीत बांधकाम न करणा-या भुखंडधारकांबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील (भुखंडाचा ताबा परत घेणे/ मुदतवाढ देणे इ.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | प्रादेशिक कार्यालय ठाणे-१ | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | एकुण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | |
| २ | प्रादेशिक कार्यालय ठाणे-२ | | | | | | | | | |
| | अति. कल्याण भिवंडी | 55.52.6 | 40.40.1 | 8<br>27.47.9 | 8<br>27.47.9 | बांधकामासाठी ची मुदत संपलेली नाही | नाही ( उर्वरित 10.96.9 क्षेत्र ओपन स्पेस अमेनिटि टी, सी .आर .झेड व रस्ते याखाली आहे | 1.95.3 | भुखंडावर बांधकाम करणेस मुदत आहे | |
| | अंबरनाथ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति. अंबरनाथ टप्पा क्र.२ | 506.64.20 | 47.70 | 3<br>30.54 | 3<br>30.54 | बांधकाम करणेसाठीची मुदत संपलेली | 16<br>पी .ए .पी प्लोट<br>7.25 | निरंक | भुखंडावर वाधकाम करणेस मुदत आहे | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नाही | (पी .ए.पी करीता 15 टक्के राखीव ) 4.75 प्लॉट वल सेन्ड 4.49 निवासी साठी | | | |
| | वदलापूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | गुरबाड १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | मुरबाड २ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | मुरबाड टप्पा क्र. ३ (सरळगाव) | ११९१.४५.८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | मुरबाड टप्पा क्र. ४ (कुडवली) | १११.६१.५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | १८६५.२४.१ | ८८.१०१ | ५८.०१.९ | ५८.०१.९ | निरंक | २७.४५९ | 1.95.3 | निरंक | |
| ३ | प्रादेशिक कार्यालय पनवेल | | | | | | | | | |
| | रायगड | | | | | | | | | |
| | १) नाणोरे औद्योगिक क्षेत्र (आय.टी.पार्क ) प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिनांक १३/०३/२००८ रोजी प्रसिध्द झालेली आहे. खाजगी- २४.००.०० हे. सरकारी- ३६.२५.०० हे. एकूण- ६०.२५.०० हे. | | | | | | | | | |
| | २) रोहा माणगाव औद्योगिक क्षेत्र प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक १९/०२/२००९ रोजी प्रसिध्द झालेली आहे. खाजगी- | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

3

12

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३३२८.६२.०० हे. सरकारी- ४७.००.३० हे. एकूण- ३३७५.६२.३० हे. | | | | | | | | | |
| | ३) पळसगांव औद्योगिक क्षेत्र प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक २८/०५/२००९ रोजी प्रसिध्द झालेली आहे. खाजगी- ११३५.७८.८० हे. सरकारी- ३७.२३.७० हे. एकूण- ११७३.०२.५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |



13

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ० हे. | | | | | | | | | |
| | ४) वारळ औद्योगिक क्षेत्र प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक २८/०५/२००९ रोजी प्रसिध्द झालेली आहे. खाजगी-२६७.९१.३० हे. सरकारी-११०.४१.६० हे. एकूण-३७८.३२.९० हे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ४ | प्रादेशिक कार्यालय रत्नागिरी | | | | | | | | | |
| | वेंगुर्ला औद्योगिक | ९३४.२४.४७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

१०

5

14

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र | | | | | | | | | |
| | मार्गताम्हणे | ३३६०.१०.०८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | ४२९४.३४.५५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | |
| ५ | प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद | | | | | | | | | |
| | देवगांव (रंगारी) ता. कन्नड जि. औरंगाबाद एकूण क्षेत्र = ३६.४९ (दिनांक. १४/०१/२०१० ) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | शेंद्रा अतिरिक्त प्रस्ताव गट नंबर. २२२, २२६ व २२७ एकूण क्षेत्र = ३०.४९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | गांधेली विशेष आर्थिक क्षेत्र एकूण क्षेत्र = २७६३.२१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अतिरिक्त वाळूज औद्योगिक क्षेत्र एकूण क्षेत्र | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | =३४३.६८ | | | | | | | | | |
| | बिडकीन औद्योगिक क्षेत्र एकूण क्षेत्र =२३६३.८२९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अतिरिक्त जालना टप्पा क्रमांक-३ एकूण क्षेत्र = २६१.७६ | २६०.७६ ०८/०९/२०१० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अतिरिक्त माजलगांव औद्योगिक क्षेत्र एकूण क्षेत्र = १६९.६० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति. शेंद्रा औद्योगिक क्षेत्र (लाडगाव) | २४०.४९ १८/११/२०१० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | ५०१.२५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ६ | प्रादेशिक कार्यालय नागपूर | | | | | | | | | |
| | जिल्हा नागपूर अति. बुटीबोरी टप्पा -१ | २७८.५८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण-६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.०४/०१/२००७ रोजी प्रसिध्द झाली असून संयुक्त मोजणी करीता पाठपुरावा सुरु आहे. |

-7-

16

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | अति. बुटीबोरी टप्पा -२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण-६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासनराजपत्रात दि.२७/०९/२००७रोजी प्रसिध्द झाली असून संयुक्त मोजणी पुर्ण झालेली आहे. संयुक्त मोजणी अहवाल पत्रक अप्राप्त आहे. |
| | जिल्हा वर्धा अति कारंजा | २३४.१० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.११/०२/२०१० रोजी प्रसिध्द झालेली असून उपविभागीय अधिकारी आर्वी यांचे मार्फत पुढील भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. |
| | जिल्हा गोंदिया | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | जिल्हा भंडारा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | जिल्हा चंद्रपूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | जिल्हा गडचिरोली आष्टी | २१०.४० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१२/११/२००९ रोजी प्रसिध्द झाली आहे. प्रकरणी कलम ३२ (२) वरील हरकती अहवाल मुख्यालयास पत्र क्र.३९७६ दि.२३/०८/२०१० नुसार सादर करण्यात आलेला आहे. तसेच ता.नि.भू.अ. चामोर्शी यांचेकडून प्राप्त झालेल्या मोजणी फी मागणीबाबत पत्र क्र. ३९७५ दिनांक २३/०२/२०१० अन्वये मुख्यालयास मंजूरीस सादर केले आहे. |
| | एकूण | २११४.९३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ७ | प्रादेशिक अधिकारी सांगली | | | | | | | | | |
| | विटा | | ५५.२७ | १०९ | ९९ | वाटप झालेल्या | ६ (क्षेत्रफळ | नाही | वाटप झालेल्या भूखंडाचा विहित | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (वि.के.) | | | (क्षेत्रफळ २६.४८) | (क्षेत्रफळ २०.४०) | भूखंडाचा विहित कालावधी संपुष्टात आलेला नाही. | २.६३) | | कालावधी संपुष्टात आलेला नाही. | |
| | एकूण | निरंक | ५५.२७ | २६.४८ | २०.४० | निरंक | २.६३ | निरंक | निरंक | |
| ८ | प्रादेशिक अधिकारी कोल्हापूर | | | | | | | | | |
| | अति. शिरोली | ४२६.९८ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | |
| | करवीर (अति. कागल) | ३४४.८६ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | |
| | खंडाळा टप्पा-१ | ३०२.३७ | ३०२.३७ | ४/११८.७१५ | विकासाचे काम चालू आहे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.सातारा (देगाव) | २५२.३१ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | |
| | खंडाळा टप्पा-२ | ३१७.०३ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | |
| | खंडाळा टप्पा-३ | १७९२.४५ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | |
| | एकूण | ३४३६ | ३०२.३७ | ११८.७१५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| ९ | प्रादेशिक अधिकारी नांदेड | | | | | | | | | |
| | १) अति. नांदेड टप्पा क्र. १ (मोंदी रबर) | ५८.६५ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | सदरची जमीनीचा तावा दि. १५/१२/२००७ रोजी प्राप्त झाला असून प्रकरण महसूल न्यायाधिकरण यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे |
| | २) मुदखेड फ्लोरीक्चर पार्क | ०.८० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | सामाईक सुविधा केंद्रासाठी कलम १५ (ब) अंतर्गत ताब्यात घेण्यात आले असून पोच रस्त्याकरीता सरकारी जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर क्षेत्रावर |

१४

18

०१

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | कुठल्याही प्रकारचे भूखंड आरेखन करुन वाटप करण्याचे प्रयोजन नाही. |
| | ३) नांदेड विमानतळ विस्तारीकरण | १.१७ | निरंक | निरंक | | निरंक | | निरंक | निरंक | | निरंक | निरंक | सदरची जमीन नांदेड विमानतळ विस्तारीकरणासाठी ताब्यात घेऊन मे. नांदेड एअरपोर्ट प्रा.लि. यांना हस्तांतर करण्यात आली आहे. |
| | एकूण | ६०.६२ | निरंक | निरंक | | निरंक | | निरंक | निरंक | | निरंक | निरंक | |
| १० | प्रादेशिक कार्यालय धुळे | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | निरंक | निरंक | निरंक | | निरंक | | निरंक | निरंक | | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | | | | |
| ११ | प्रादेशिक कार्यालय पुणे-१ | | | | | | | | | | | | |
| | चाकण | २५१७.८४५ | १९५६.६१९ | (३) अ | (३) ब | (४) अ | (४) ब | (५) | (६) (अ) | (६) ब | | | |
| | | निरंक | निरंक | ३२२ | ९३७.१० | ३१० | ३३०.९१ | वाटप केलेल्या भूखंडाच्या उभारणीसाठी महामंडळाने दिलेली मुदत अद्याप संपलेली नाही. | ६३९ | ५१४.६२ | नाही. | वाटप केलेल्या भूखंडाच्या उभारणीसाठी महामंडळाने दिलेली मुदत अद्याप संपलेली नाही. | |
| | तळेगांव | १४४६.८५२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | संपादनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण होण्याची आहे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | रांजणगांव | १६०६.९२० | ६३.३७० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | महामंडळाकडे प्राप्त झालेल्या क्षेत्राचे लेआऊट | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

10

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मंजूरीचे काम चालू आहे. त्यामुळे भूखंड वाटप केलेले नाही. | | | | | |
| | बारामती | १९.५८६ | १७.८५० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | सदरचे क्षेत्र विमानतळ विस्तारीकरणासाठी घेतलेले असून मुळ भूखंडामध्ये सामिल केलेले आहे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | रस्ते व पाणी पुरवठा योजना | ७०.०५३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | संपादनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण होण्याची आहे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | ५६६१.२५६ | २०३७.८३९ | ३२२ | ९३७.१० | ३१० | ३३०.९९ | निरंक | ६३९ | ५१४.६२ | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | | | | |
| १२ | प्रादेशिक कार्यालय लातूर | | | | | | | | | | | | |
| | कौडगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा १ | १८०.७२ | १७२.०८ | १ क्षेत्र ९४.२० . | | १ क्षेत्र ९४.२० | | मुदतवाढ कालावधी आहे | भुखंड पाडण्यायोग्य जागा आहे. | | नाही | निरंक | संयुक्त मोजणी प्रमाणे प्रत्यक्ष जमिनीचा ताबा १७२.०८ हे.आर आहे |
| | अति. उस्मानाबाद | ६०.०० | ५५.८२ | १ क्षेत्र २ | | निरंक | | मुदतवाढ कालावधी आहे | ३३/१५६.२७ | | नाही | निरंक | संयुक्त मोजणी प्रमाणे प्रत्यक्ष जमिनीचा ताबा ५५.८२ हे.आर आहे |
| | लातूर विमानतळ विस्तारीकरण | ४८.५० | २४.५७ | निरंक | | निरंक | | निरंक | निरंक | | नाही | निरंक | २३.९३ हे.आर. खाजगी जमिनीचा ताबा Compulsory Award प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. |

20

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | २८९.२२ | २५२.४७ | ९६.२ | ९४.२० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १३ | प्रादेशिक कार्यालय पुणे-२ | | | | | | | | | |
| | **खेड विशेष आर्थिक क्षेत्राची माहिती** | | | | | | | | | |
| | | खाजगी क्षेत्र ७०४४.७५१० | १२२२.४९१० | P-१ & P-१/१ १२०० हे.आर. P-१/२ ५०५.६२ | २ १७०५.६२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत खेड इकॉनोमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना प्लॉट क्र.P-१/१ क्षेत्र १२०० हे.आर. चा ताबा दिनांक १८/१२/२००९ रोजी व P-१/२ क्षेत्र ५०५.६२ हे.आर. चा ताबा दिनांक ३०/६/२०१० रोजी देण्या आलेला आहे. |
| | | सरकारी क्षेत्र ७०१.१३००० | ४८३.१३०० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | नाही | निरंक | |
| | | एकूण ७७४५.८८१० | १७०५.६२१० | १७०५.६२१० | निरंक | निरंक | निरंक | नाही | निरंक | |
| | **बऊर औद्योगिक क्षेत्राची माहिती** | | | | | | | | | |
| | | ४२९.२४.३० हे. आर. | | | | | | | | |
| | एकूण | ८१७५.१२४ | १७०५.६२१० | १७०५.६२ | १७०५.६२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | | | | | | | | | | |
| १४ | प्रादेशिक अधिकारी अमरावती | | | | | | | | | |
| | पांढरकवडा, | २८.९६ हे. आर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | वनविभागाने आक्षेप घेतल्यामुळे सदरचे |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जि. यवतमाळ २८.९६ हे. आर सरकारी जमीनीस खंड २ (ग) दि. ०३.०६.२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. | | | | | | | | | औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आलेले नाही. |
| | एकूण | २८.९६ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १५ | प्रादेशिक कार्यालय नाशिक | | | | | | | | | |
| | वाडीवऱ्हे औद्योगिक क्षेत्र | २१२.३६१० ---------- ०६/०८/२००७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | गोंदे औद्योगिक क्षेत्र | १२९.४८१० ---------- ०९/०८/२००७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.दिंडोरी औद्योगिक क्षेत्र | ३८६.०४ ---------- ०८/०१२/०७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.मालेगांव औद्योगिक क्षेत्र (सायने बु.) | ११३.२०१७ ---------- ०४/०६/०९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.मालेगांव औद्योगिक क्षेत्र | ४९४.३४९ ---------- १९/०२/०९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

१८

13

252

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (सायने बु.), | | | | | | | | | |
| | अति.मालेगांव औद्योगिक क्षेत्र (सायने बु.,चिखल ओहोळ) | ६२७.९१ ------------ १९/०२/०९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.मालेगांव औद्योगिक क्षेत्र (जळकु,झोडगे) | २३५४.३० ------------ १९/०२/०९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.सिन्नर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ | १४५६.४३५ ------------ ०२/०८/०७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.सिन्नर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.३ | ६५१.८१ ------------ २०/०९/०७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अति.सिन्नर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.४ | २३०.६७ ------------ २०/०९/०७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | नियोजित येवला औद्योगिक क्षेत्र | १०९.३४ ------------ २८/०५/०९ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |

14

23

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अहमदनगर जिल्हा. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | सुपा-पारनेर टप्पा क्र.२ | ९४६.७०३<br>---------------<br>३०/०९/२०१० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | अकोला औद्योगिक क्षेत्र | ४२.७८२०<br>---------------<br>१२/१०/०७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण | ७७५५.३८२७ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| १६ | प्रादेशिक कार्यालय महापे | | | | | | | | | |
| | खालापूर औ. क्षेत्र.<br>टप्पा क्र.-१.<br>1) टेंभ री<br>2) नढाळ<br>3) लोधि व ली<br>4) वयाळ<br>5) रिस<br>6) सारग<br>एकूण क्षेत्र 453.08.57हे .आर . | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | |
| | एकूण 453.08.57 | ३४११९८२.३२९२ | ४४४१.६७१ | ४४७/२९४२.१३४ | निरंक | ४२०/२२०९.१४९ | निरंक | ६७८/७००.९७९ | १.९५३ | |

२०

15

२५

विवरणपत्र -२

मागील ५ वर्षामध्ये खाजगी उद्योगांच्या मागणीनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या भूसंपादनाचा तपशील

| मागील ५ वर्षात म.औ.वि. अधिनियम, १९६१ अन्वये अधिसूचित क्षेत्र | अधिसूचित क्षेत्रापैकी महामंडळाच्या ताब्यात आलेले क्षेत्र | ताबा प्राप्त क्षेत्रापैकी संबंधित खाजगी उद्योगांना हस्तांतरीत केलेले क्षेत्र | महामंडळाने क्षेत्र हस्तांतरीत केल्यानंतरही उद्योग उभारणी न झालेले क्षेत्र | क्षेत्र हस्तांतरीत केल्यानंतरही उद्योग उभारणी न होण्याची कारणे | उद्योग उभारणी न केलेल्या क्षेत्रापैकी महामंडळाने संबंधित उद्योजकांकडून परत घेतलेले क्षेत्र | उद्योग उभारणी न झालेल्या क्षेत्रापैकी मुळ शेतक-यांना परत केलेले क्षेत्र (कलम ३९(२) अन्वये) | विहीत मुदतीत बांधकाम न करणा-या खाजगी उद्योगांबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील (क्षेत्राचा ताबा परत घेणे/ मुदतवाढ देणे इ.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| प्रादेशिक कार्यालय ठाणे-१ | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय ठाणे-२ | | | | | | | |

16

28

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय पनवेल | | | | | | | |
| १) राजणखार औद्योगिक क्षेत्र (विशेष अर्थिक क्षेत्र) (इंडिया बुल करिता) प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक २७/१०/२००६ व २७/१२/२००६ रोजी प्रसिध्द झालेली आहे. खाजगी- २५४७.९९.७२ हे. सरकारी- १३०.१०.४५ हे. एकूण- २६७८.१०.१७ हे. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २) शहापूर औद्योगिक क्षेत्र (टाटा पॉवर प्रकल्प) प्रकरण ६ ची अधिसुचना शासन राजपत्रात दिनांक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

२२

17

२८

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६/११/२००६ प्रसिध्द झालेली आहे. खाजगी- ४००.३३.८७ हे. सरकारी- ५९.५८.०० हे. एकूण- ४५९.९१.८७ हे. | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण-३१३८.०२०४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय रत्नागिरी | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय नागपूर | | | | | | | |
| जिल्हा नागपूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| मौदा एन.टी.पी.सी. करीता ६९५.२८ | ५५४.१६ | ५५४.१६ | बांधकाम सुरु आहे. | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र राजपत्रात दि.२६/०६/२००८ रोजी प्रसिध्द झालेली आहे.उर्वरीत जमिनीच्या मोबदला रकमेचे वाटप प्रकल्प अधिकारी एनटीपीसी. तथा विशेष भूसंपादन अधिकारी नागपूर |

27

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | यांचे मार्फत सुरु आहे. |
| मौदा एन.टी.पी.सी. टप्पा -२ ३३८.०६ | ३३८.०६ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र राजपत्रात दि.२९/०४/२०१० रोजी प्रसिध्द झालेली आहे प्रकरणी एकूण ६ गावापैकी २ गावाच्या जमिनीबाबत कलम ३२(२) वरील हरकती अहवाल पत्र क्र. ०८ दि. ०३/०१/२०११ नुसार मुख्यालयास सादर करण्यांत आला आहे. |
| जिल्हा वर्धा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| जिल्हा गोंदिया | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| अति. तिरोडा मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लि. करीता १९२.६७ | १००.७१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. १६/०६/२००९ रोजी प्रसिध्द झालेली आहे. १००.७१ हे.आर. जागेचा ताबा महामंडळास दि.२१/०१/२०११ रोजी प्राप्त झाला. कंपनीस ताबा देणेबाबतचा प्रस्ताव पत्र क्र.६११ दि. ३१/०१/२०११ नुसार मुख्यालयास सादर केलेला आहे. |
| जिल्हा भंडारा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| जिल्हा चंद्रपूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| वरोरा मे. वर्धा पॉवर कंपनी करीता ३८.७५ | ३५.८७ | ३५.८७ | बांधकाम सुरु आहे. | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.११/०१/२००८रोजी प्रसिध्द झालेली आहे. २.८८ हे.आर जागा विना अधिसुचना करणेचा प्रस्ताव |

19

29

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुख्यालयास दि.०४/०९/२००९ अन्वये सादर केलेला आहे. |
| वरोरा रल्वे सायडींग | २०.९८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | प्रकरण ६ ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१२/०४/२००७ रोजी पसिध्द झालेली असून भूसंपादनाची कार्यवाही उप विभागीय अधिकारी वरोरा यांचे मार्फत सुरु आहे. |
| जिल्हा गडचिरोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| एकूण-१२६४.७६ | १०४९.७८ | ५९०.०३ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय सांगली | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय कोल्हापूर | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय नांदेड | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय धुळे | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय पुणे-१ | | | | | | | |
| | | | | | | | |

२९

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय लातूर | | | | | | | |
| | | | | | | | |
| एकूण | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय पुणे-२ | | | | | | | |
| **खेड विशेष आर्थिक क्षेत्राची माहिती** | | | | | | | |
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| **कार्ला औद्योगिक क्षेत्राची माहिती** | | | | | | | |
| ११८७.४५.१४ हे. आर. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| एकूण ११८७.४५.१४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय अमरावती | | | | | | | |
| १२३.९४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | मे. इंडिया बुल्स पॉवर लि. यांचे प्रस्तावित औष्णिक विद्यूत प्रकल्पाकरीता प्रस्तावित रेल्वे साईडिंग साठी जाग अधिसुचित करण्यात आली असून, भूसंपादन कार्यवाही उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचेमार्फत सूरू आहे. |
| एकूण - १२३.९४ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| प्रादेशिक कार्यालय नाशिक | | | | | | | |

2.1

30

## वित्त विभाग

(१) अंतिम अधिसूचना क्रमांक ५—महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) नियम,२०११ प्रसिद्ध करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक तेविआ-१०१०/प्र.क्र.७४/२०१०/वित्त आयोग कक्ष, दिनांकित ११ मार्च, २०११

आणि

(२) अंतिम अधिसूचना क्रमांक ५४—महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन(सुधारणा) नियम,२०१२ प्रसिद्ध करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक तेविआ-१०१०/प्र.क्र.७४/२०१०/वित्त आयोग कक्ष, दिनांकित १९ मार्च, २०१२

(१) अंतिम अधिसूचना क्रमांक ५—महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन(सुधारणा) नियम,२०११ प्रसिद्ध करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक तेविआ-१०१०/प्र.क्र.७४/२०१०/वित्त आयोग कक्ष, दिनांकित ११ मार्च, २०११

उद्देश :

उक्त अधिसूचना निर्गमित करण्यामागचा उद्देश विभागाने खालीलप्रमाणे विषद केला आहे.

राज्य शासनाने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ (महाराष्ट्र अधिनियम क्र.१६, २००५) लागू केला आहे. या अंतर्गत कलम-३ नुसार राज्य शासनाने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर प्रत्येक आर्थिक वर्षी मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण व राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र पटलावर ठेवणे बंधनकारक आहे.

दरवर्षी **FRBM Act** मधील विवरणपत्र-४ (बी-४/ख-४) (राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या व वेतनावरील खर्च) याबाबतची माहिती अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून मागविण्यात येऊन ती सभागृहासमोर ठेवण्यात येत होती. परंतु अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून सदर माहिती संकलनाचे काम थांबविण्यात आल्यामुळे सदर माहिती पुरविण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली आहे. तसेच सहसंचालक (तांत्रिक), लेखा व कोषागारे यांनीही सदरची माहिती सेवार्थ संगणक प्रणालीद्वारे संकलित करण्यात येत असून सदरची संगणक प्रणाली संपूर्ण राज्यभर कार्यान्वित होणे बाकी असल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे विवरणपत्र-४ (बी-४/ख-४) साठी आवश्यक असणारी परिपूर्ण व अचूक माहिती शासनाकडे उपलब्ध नाही.

उपरोक्त बाब लक्षात घेता महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम,२००५ नुसार विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येणारे महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र व प्रकटीकरणे यामधील विवरणपत्र ४ (बी-४/ख-४) "कर्मचाऱ्यांची संख्या व वेतनावरील खर्च" यांचे नमुना ख मधील विवरणपत्र तूर्तास वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त अधिसूचना दिनांक २१ मार्च, २०११ रोजी विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात आली होती.

उपरोक्त अधिसूचना समितीने दिनांक ६ जुलै,२०११ रोजीच्या बैठकीत विचारात घेतली असता सदरहू अधिसूचनेसंदर्भात महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, २००६ च्या नियम ८ च्या खंड (१) मधील उप-खंड (घ) वगळण्याची निकड शासनास का वाटली? माहिती संकलित करण्याचे काम कोणाच्या आदेशानुसार थांबविण्यात आले? याबाबत माहिती घेण्यासाठी समितीने वित्त विभागाच्या सचिवांची तसेच नियोजन विभागाचे अर्थ व सांख्यिकी संचालक यांची साक्ष घेण्याचे ठरविले व त्यानुसार दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे साक्ष घेण्यात आली.

साक्षी दरम्यान वित्त विभागाच्या सचिवांनीं अधिसूचनेसंदर्भातील पार्श्वभूमी समितीस खालीलप्रमाणे विदित केली.

शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या वेतनावरील खर्च या संदर्भातील माहिती नियोजन विभागाकडून दरवर्षी देण्यात येत होती. राज्य शासनाने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ लागू केला. या अधिनियमातील कलम-३ नुसार राज्य शासनाने प्रत्येक वर्षी मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण व राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार ते ठेवण्यात येत होते. मध्यंतरी "सेवार्थ" आज्ञावली विकसित करण्यात आली. या सेवार्थ प्रणालीमध्ये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन काढले जाणे अपेक्षित आहे. सन २००९ मध्ये तसेच २०१० मध्ये बरीचशी विभागीय कार्यालये या प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आली. जिल्हा स्तरावर टप्प्याटप्प्यामध्ये हे काम करण्यात आले. ही सर्व प्रक्रिया सुरु असताना नियोजन विभागाच्या सचिवांनी एक बैठक घेतली होती. या आज्ञावलीचा वापर वाढत असून कर्मचाऱ्यांसंदर्भातील गोळा करण्यात येत असलेली माहिती फक्त साठवणूक करण्यासाठी असल्यामुळे त्यासाठी वेळ, श्रम आणि पैसा वाया जातो ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन ती माहिती गोळा करण्याचे काम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. सेवार्थ प्रणाली परिपूर्ण झालेली नाही, त्यामध्ये काही अडचणी आहेत. तेव्हा पूर्वीचीच पध्दती चालू ठेवावी असे नियोजन विभागाला सांगण्यात आले, परंतु विभागाने त्यावर विचार केला नाही. सन २०१०-२०११ पर्यंत ही माहिती प्रसिद्ध केलेली आहे. नियोजन विभागाने सदरहू माहिती देण्याचे बंद केल्यामुळे सन २०११-२०१२ मध्ये ही माहिती प्रसिद्ध होऊ शकली नाही. नियोजन विभागाने वित्त विभागाला सदरहू सांख्यिकी माहिती देणे बंद केलेले आहे. ही सर्व माहिती सेवार्थ प्रणालीद्वारा उपलब्ध होऊ शकते. परंतु सेवार्थ प्रणालीमध्ये काही प्राब्लेम्स असल्यामुळे सर्व माहिती उपलब्ध झालेली नाही. ज्यावेळेस निर्णय झाला त्यावेळी दिनांक १ ऑक्टोबर,२०१० रोजी राज्यामध्ये १२ हजार डी.डी.ओ.होते. त्यापैकी ३३३१ डी.डी.ओ हे सेवार्थ प्रणालीमधून वेतन देयक काढत होते. सेवार्थमध्ये सर्व डी.ड़ी.ओ.ची माहिती कॅप्चर होऊ शकत नाही म्हणून ती सेवा बंद करणे बरोबर होणार नाही असे सांगण्यात आले. मध्यंतरीच्या काळात

सर्व डी.डी.ओ. सेवार्थमध्ये आणण्याचा प्रयत्न चालू होता. सेवार्थ प्रणालीमध्ये जास्तीत जास्त डी.डी.ओ. कव्हर होऊन सर्व कर्मचारी कॅप्चर व्हावेत अशी अपेक्षा आहे. आता एकूण ११ हजार ७३५ डी.डी.ओ.पैकी ११ हजार ४९८ डी.डी.ओ.ना सेवार्थ प्रणालीमध्ये आणलेले आहे. म्हणजे २३७ डी.डी.ओ.सेवार्थ प्रणालीमध्ये नाहीत. २३७ डी.डी.ओ.पैकी ६२ नॉन सॅलरी डी.डी.ओ.आहेत. म्हणजे १७५ डी.डी.ओ. सेवार्थ प्रणालीमध्ये नाहीत. जे डी.डी.ओ.सेवार्थ प्रणालीमध्ये आलेले नाहीत त्यांचा पगार थांबविण्यात येईल अशा प्रकारच्या सूचना देखील दिलेल्या आहेत. त्याबाबत फॉलोअप सुरु आहे. १७५ डी.डी.ओ.सेवार्थमध्ये आले तर आपणास कर्मचाऱ्यांची अचूक (Accurate) माहिती मिळू शकेल.

त्यावर, काही ठिकाणी संगणकीकरणाचे काम मागे का राहिले ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काही ठिकाणी डी.डी.ओ.नी सेवार्थ प्रणालीचा वापर केलेला नाही. काही ठिकाणी रिमोट एरिया आहे त्या ठिकाणी कनेक्टीव्हीटीचा प्रश्न होता तो प्रश्न दूर केलेला आहे. आज सेवार्थ प्रणालीद्वारे ४ लाख ५१ हजार ६५१ कर्मचाऱ्यांना वेतन मिळत आहे. त्यावर समितीने असे अभिप्राय व्यक्त केले की, राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्याचे काम नियोजन विभागाकडून केले जात होते. संपूर्ण संगणकीकरण झाल्यानंतर आणि तशाप्रकारची जबाबदारी वित्त विभागाने स्वीकारल्यानंतरच माहिती संकलित न करण्याचा निर्णय नियोजन विभागाने घेणे आवश्यक होते. घटनात्मक तरतुदीनुसार विधानमंडळाच्या मान्यतेशिवाय, स्पेसिफिकली, विधानसभेच्या मान्यतेशिवाय शासनाला एक पैसा देखील खर्च करण्याचे अधिकार नाहीत. अशी घटनात्मक तरतूद असताना विधानमंडळासमोर माहिती न ठेवण्याची कारणे काय आहेत ? वित्त विभागाने विधानमंडळाचा हक्कभंग केलेला आहे. त्यामुळे वित्त विभागाच्या सचिवांनी समितीला केलेली विनंती व खुलासा, समितीने उपस्थित केलेले प्रश्न लक्षात घेता राज्याचे मुख्य सचिव, नियोजन विभागाचे सचिव व वित्त विभागाचे सचिव यांची एकत्रित साक्ष समितीसमोर आयोजित करण्यात यावी, असा निर्णय समितीने घेतला व तसे संबंधित विभागासही कळविण्यात आले.

